<u>निशाणी क्र. ३७ खालील आदेश</u>

वादीने सदर अर्ज पोलीस संरक्षण मिळणेकरीता दाखल केला आहे. वादीचे थोडक्यात कथन असे की, तिने सदरचा दावा कायम मनाई हुकुम मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ०१ ते ०६ हे प्रस्तुत प्रकरणात हजर होऊन त्यांनी दाव्यात लेखी जवाब आणि तात्पुरत्या मनाई हुकुमाला उत्तर दिले. तिच्या मालकी, वहिती व ताब्यातील मौजे शेलू खडसे ता. रिसोड येथील गट क्र. ६४० मधील ०० हे. ८२ आर. (०२ एकर ०२ गुंठे) जिच्या चतु:सिमा पुर्वेस-संतोष भानुदास खडसे, अंकुश उर्फ गणेश भानुदास खडसे, ज्योती भानुदास खडसे व उत्तम निंबाजी खडसे, पश्चिमेस-ज्ञानेश्वर आश्रुजी खडसे, कस्तुरबाई आश्रुजी खडसे, अरुणाबाई सुर्यभान सावंत, उत्तरेस-उत्तम निंबाजी खडसे, दक्षिणेस-पांदन रस्ता, या चतु:सिमेच्या आतील शेतजमीन प्रतिवादी क्र. ०१ ते ०६ यांनी व त्यांच्यामार्फत इतर कोणीही तिच्या ताब्यातील मौजे शेलु खडसे ता. रिसोड येथील गट क्र. ६४० मधील ०० हे. ८२ आर. जमिनीवर तिच्या शांततामय ताब्यास व कब्ज्यास कोणत्याही प्रकारे अडथळा करु नये, असा आदेश वि. न्यायालयाचा दिनांक ३०.१०.२०२० पारीत केला.

<u>**०२**</u> वाद मिळकतीची वादी हिने वहिती केली असून वाद मिळकतीत सद्यस्थितीत सोयाबीन पिक उभे आहे. असे असतांना दिनांक १०.१०.२०२२ रोजी अंदाजे १०.०० वाजता ती व तिचे पती शेतामध्ये सोयाबीन पीक कापणीसाठी गेले असतांना प्रतिवादी क्र. ०१ ते ०६ व त्यांचे सहकारी हे बेकायदेशीररित्या तिच्या वाद मिळकतीत जबरदस्तीने आले व वाद मिळकतीशी तिचा काहीही संबंध नसून जबरीने वाद मिळकत ताब्यात घेणार, असे म्हणाले. तिने प्रतिवादींना वि. न्यायालयाचा मनाईहुकुमाचा आदेश तिचे बाजुने झालेला, असल्याचे सांगितले. प्रतिवादींनी तिला व तिच्या पतीला वाद मिळकतीत दिसल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे तिने दिनांक २९.०५.२०२२ व १८.०६.२०२२ रोजी पोलीस स्टेशन रिसोड येथे रिपोर्ट दिले होते. परंतु

पोलीसांनी दिवाणी स्वरुपाचा वाद असल्याचे सांगून कोणतीही कार्यवाही केली नाही. प्रतिवादींना कायद्याची भिती नसुन त्यांचा गावात जोडजमाव आहे. त्यामुळे तिला वाद मिळकतीची वहिती करणे अशक्य झाले आहे. अशा परिस्थितीत सोयाबीन पिकाची कापणी, सुडी लावणी व वाद मिळकतीत इतर मशागती पोलीस मदती शिवाय सदर कामे करणे शक्य नाही. त्यामुळे तिने पोलीस मदत मिळणेची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

<u>०३</u> याउलट प्रतिवादींच्या वकीलांनी म्हणणे दाखल केले की, नि.क्र. ०५ वर झालेला ओदशाबाबत त्यांना कोणताही वाद नाही. परंतु या अर्जातील परिच्छेद क्र. ०२ मधील दिनांक १०.१०.२०२२ ची संपुर्ण घटना त्यांनी नाकारुन धमक्या दिल्याबाबतचा मजकुर सुध्दा नाकारला. दिवाणी स्वरुपाचे प्रकरण सांगून पोलीसांनी वादीने दिनांक २९.०५.२०२२ व १८.०६.२०२२ रोजी वादीने रिपोर्ट दिल्याचे, तसेच सोयाबिन पिकाबद्दलचा मजकूर सुध्दा नाकारला. वादीने प्रतिवादींविरुध्द यापुर्वी संपुर्ण खोटे रिपोर्ट दिल्यामुळेच प्रतिवादींवर कोणतीही कार्यवाही झाली नाही. तसेच अर्जासोबत दाखल केलेले रिपोर्ट हे जुने व खोटे आहेत. पोलीस मदत मिळणेचा अर्ज करण्यासाठी कोणतेही कारण घडलेले नाही व तसा रिपोर्ट सुध्दा नाही. केवळ वादीला त्रास होण्याच्या उद्देशाने खोटा आणि नियमबाह्य अर्ज वादीने केल्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**<u>०४</u>** दोन्ही युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादींनी वाद मिळकतीवर बेकायदेशीर अडथळा करु नये, असा कायम मनाईहुकुम मिळणेकरिता वादीने सदर दावा दिनांक ०३.०८.२०२० रोजी दाखल केला होता. दाव्या सोबत नि.क्र. ०५ वरील तात्पुरत्या मनाईहुकुमाचा अर्ज दाखल केला होता. दोन्ही पक्षांचे कथन ऐकुन नि.क्र. ०५ वरील अर्ज वादीच्या हक्कात दिनांक ३०.११.२०२० रोजी मंजूर करण्यात आला होता. त्यानंतर प्रकरण मुद्दे काढण्यासाठी ठेवण्यात आले. त्यानंतर प्रतिवादींनी प्रकरण खारिज करणेबाबतचे अर्ज दाखल केलेले आहेत तर वादीने पुराव्याकरिता वेळ मिळणेचे अर्ज दाखल केलेले आहेत. दोन्ही पक्षांचे कथन ऐकुन वादीला पुरावा दाखल करावा अन्यथा पुरावा बंद करण्यात येऊन प्रकरण खारीज करण्यात येईल, असे निर्देशीत करण्यात आले होते.

**<u>०५</u>** त्यानंतर वादीच्या वकीलांनी दिनांक ०४.०८.२०२२ रोजी दाव्यात दुरुस्ती करण्याचा अर्ज दाखल केला. दोन्ही पक्षांचे कथन ऐकुन सदरचा अर्ज मंजूर करण्यात आला होता. दिनांक १४.१०.२०२२ रोजी परत प्रतिवादींच्या वकीलांनी प्रकरण खारीज करण्याचा अर्ज नि.क्र. ३४ वर दाखल केला. त्याच दिवशी वादीच्या वकीलांनी पोलीस मदत मिळणेकरिता नि.क्र. ३७ नुसार सदरचा अर्ज दाखल केला आहे.

<u>०६</u> अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे नातेवाईक असून त्यांच्यातील संबंध ताणलेले आहेत. दोन्ही पक्षांमध्ये अगोदरच बरीच फौजदारी प्रकरणे प्रलंबित आहेत. नि.क्र. ०५ वरील अर्ज वादीच्या हक्कता मंजूर झालेला आहे. त्यानंतर प्रतिवादीतर्फे नि.क्र. ०५ वरील आदेशावर अपील दाखल केल्याचे आणि नि.क्र. ०५ वरील आदेशाला स्थगिती असल्याचे त्यांचे कथन नाही. त्यामुळे नि.क्र. ०५ वरील आदेशाला स्थगिती असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वरील सर्व कारणांचा विचार करुन माझे असे मत आहे की वादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने योग्य त्या पोलीस संरक्षणाच्या खर्चाचा भरणा संबंधीत कार्यालयात करावा.

Digitally signed by YOGESH DATTATRAY KOINKAR
Date: 2022.10.21 16:51:55 +0530

(योगेश द. कोईनकर)

दिनांकः २१.१०.२०२२ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, रिसोड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Rohit D. Pandit (Stenographer L.G.) |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 21.10.2022 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 21.10.2022 |
| Judgment/Order uploaded on | : | 21.10.2022 |